वर्ष २२
अंक १२ वा
१५ जून १९४९

# समाजस्वास्थ्य



संपादक -
र. धों. कर्वे.
एम्. ए.

किंमत
४
आणे

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | काम आणि प्रेम–२ ... ... ... | २६७ |
| २. | पुण्याचें साहित्यसंमेलन ... ... ... | २७३ |
| ३. | दोन मराठी बोलपट ... ... ... | २७५ |
| ४. | जपान जागा झाला—हिंदुस्थान घोरत आहे ... | २७६ |
| ५. | पत्रव्यवहार ... .... ... ... | २७७ |
| ६. | शारदेचें पत्र ... ... ... ... | २८४ |



## अजंटांचीं नांवें

**मुंबई :** श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें :** अल्. के. जोशी, बुकसेलर

डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**कोल्हापूरः** स्कूल ॲन्ड कॉलेज बुकस्टॉल.

**बेळगांवः** डी. अेम. पटेल, २८७२ खडे बाजार.

**अहमदनगरः** पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

**निपाणी :** के. एस्. बळगुर्गी

**कुमठा :** आर्. एम्. कामत

**गोकाक :** पी. एम्. शिरगांवकर

**बारामती :** मोहन बुक डेपो

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# काम आणि प्रेम–२

प्रेमाचीं उदाहरणें सर्व देशांत प्राचीन काळापासून माहीत आहेत आणि प्रेमाकरतां युद्धें झाल्याच्याही हकीकती अितिहासांत सांपडतात. कित्येक धर्मांतही प्रेमाची महति सांगितली आहे, पण तें विशेषतः ीश्वरासंबंधी प्रेम. अर्थात् उत्कट प्रेमाचें वर्णन ईश्वरासंबंधी केलेलें असलें तरी प्रेमिकांना तें आपलेंच वाटतें यांत नवल नाही. शिवाय धर्माचा व प्रेमाचा घोटाळा विशेषतः स्त्रिया करीत असतात. येशू क्रिस्ताच्या पुतळ्याला आलिंगन देणाऱ्या क्रिस्ती स्त्रिया आढळतात आणि हिंदू स्त्रियांना कृष्णाच्या व गोपींच्या लीला प्रिय असतात. या गोपी विवाहित असूनही श्रीकृष्णाच्या मागें लागत असत, अशीं वर्णनें धार्मिक लोकांनीच लिहिलेलीं आहेत. क्रिस्ती धर्मांत विवाहबाह्य समागमाला वाव ठेवलेला नाहीं, यामुळें एकेरी प्रेमाला फाजील महत्व आलें. ज्या समाजांत विवाहबाह्य समागम पाप मानलेला नसेल, तेथें प्रेमाला फारसें महत्व मिळणार नाही. पण जेथें समागम हें पाप आहे आणि फक्त विवाहानेच या पापाला परवानगी मिळते, तेथें साहजिकच एकनिष्ठ प्रेमाला अधिक महत्व येतें.

क्रिस्ती धर्माचा उदय होण्यापूर्वी समागमावरील निर्बंध बरेच सैल होते आणि यामुळेंच प्राचीन ग्रीक समाजांत गणिकांचा दर्जा मोठा होता. पण क्रिस्ती क्लीबनीतीच्या प्रसाराबरोबर गणिका म्हणजे पापाला उत्तेजन देणाऱ्या स्त्रिया अशी कल्पना रूढ झाली आणि वेश्या हलकट झाल्या. हीच कल्पना हिंदुस्थानांतही पसरली आणि प्राचीन गणिकांचा दर्जा हल्लीच्या

वेश्यांना राहिला नाही. जपानांत क्रिस्ती धर्माचा प्रसार फारसा न झाल्यामुळें तो दर्जा अगदी अलीकडेपर्यंत कायम होता व अजूनही तेथें उच्च दर्जाच्या गणिका आहेत. पण तेथेंही क्रिस्ती लोकांचें वजन वाढतच गेलें आहे आणि त्याचे परिणाम तसेच होणार असें दिसत आहे.

पण क्रिस्ती धर्माचा हा दरारा सर्वांनाच नडतो आणि त्यांतून कांही तरी मार्ग काढण्याच्या खटपटी चालू असतात. याच कारणाने अमेरिकेंत कांही संस्थानांत तरी घटस्फोटांचें प्रमाण इतकें वाढलें आहे. बेन लिंडसे यांचे मतें हें प्रमाण विवाहांच्या पन्नास टक्क्यांपर्यंत पोंचलेलें आहे.

पण ज्या समाजांत समागम हें पाप मानलेलें नसेल आणि फक्त विवाहानेच समागमाला परवानगी मिळते ही कल्पना रूढ नसेल, तेथें एकनिष्ठ प्रेमाला फारसें महत्व मिळणें शक्य नाहीं. उदाहरणार्थ आफ्रिका, पॉलिनीशिआ, वगैरे प्रदेशांतील स्त्रियांना समागमांत पाप वाटत नाहीं. तो एक सुख मिळवण्याचा मार्ग आहे आणि त्याकरतां एकनिष्ठ प्रेमाची जरूर नसते, अशी खात्री असल्यामुळें त्या प्रेमाची वाट पहात नाहीत. अशीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे सोंवळ्या पाश्चात्यांना या बाबतींत निसर्गनियम काय आहे हें समजूं लागतें. समागमाची लाज वाटण्याचें कारणच नसल्यामुळें समागम तात्पुरत्या आवडीवर अवलंबून असतो, त्याकरतां उत्कट प्रेमाची बिलकुल गरज नसते, हें त्यांच्या लक्षांत येतें.

एकनिष्ठ प्रेमाचें भवितव्य काय असतें हेंही पाहिलें पाहिजे. प्रेमाच्या भरांत तें जन्मभर टिकेल अशी आशा असते, किंवा खात्रीही असते, आणि या प्रामाणिक समजुतीने अेकमेकांच्या आणाभाकाही होतात, पण प्रत्यक्ष अनुभव काय येतो? अेकमेकांबद्दल प्रेम कितीही असलें तरी अेकदां कोणत्याही दोन व्यक्तींच्या समागमांतील नावीन्य नाहीसें झालें, ती अेकदां संवयीची गोष्ट झाली, म्हणजे त्या प्रेमाचें महत्व संपतें. अर्थात् यानंतर समागमापासून सुख होणार नाहीं असें नाही. तें होओीलच, पण त्याला प्रेमाची विशिष्ट खुमारी राहणार नाही. अितकेंच नव्हे तर विवाहितांना कोण-

ताही बाह्य निर्बंध नसल्यामुळें अतिरेकाचाही संभव असतो आणि त्याचे परिणाम मोठेसे स्पृहणीय नसतात. कित्येक पुरुष तर स्वतःच्या पत्नीपुरते नपुंसक होतात, येथपर्यंत मजल जाते. यानंतर प्रेम दुसऱ्या अेखाद्या व्यक्तीवर बसलें तरच प्रेमाची खुमारी पुन्हा निर्माण होते, पण या प्रेमाला समाजाची परवानगी नसते. अशा स्थितींत कित्येक विवाहित जोडप्यांत अेकाच्या किंवा दोघांच्याही अिच्छेने समागम वर्ज्य असतो. फ्रेंच कवि मिश्ले यानें या स्थितीला वैवाहिक घटस्फोट असें नांव दिलें आहे. अिंग्रज कवि किप्लिंग यानें देखील म्हटलें आहे की प्रेमाचा असा बोजवारा झाल्यावर तोच चेहरा जन्मभर पहात बसावें लागण्यासारखी दुसरी शिक्षा नाही. संसार दुःखमय आहे ही क्रिस्ती धर्माची शिकवण अशा वेळीं चांगली पटते. अर्थात् मुलें झालेलीं असल्यास ही शिक्षा तितकी भासत नाही, पण ती शिक्षाच आहे यांत शंका नाहीं.

प्रेमाचा आणखी अेक दुष्परिणाम म्हणजे प्रेमामुळें प्रेमपात्रावर आपला मालकीहक्क मानून त्याला प्रेमाच्या उबेने बेजार करण्याची कित्येकांची प्रवृत्ति असते आणि त्याला कोणत्याही प्रकारचें स्वातंत्र्य रहात नाही. याशिवाय आणखी असूया असली तर पहायलाच नको. या प्रेमाच्या जाचांतून केव्हां अेकदां सुटेन असें वाटून जीव कासावीस होतो. अशा प्रेमापेक्षां द्वेष बरा म्हणण्याची वेळ येते.

खरें पाहिलें तर अेकनिष्ठ प्रेम विरहामुळेंच टिकतें, पण प्राप्ति झाल्यावर तें कमी होतें आणि ही प्राप्ति कायम झाल्यास तें अजीबात नाहीसें होतें. विवाहितांना हा अनुभव नेहमी येतो आणि अविवाहित जोडपें अेकत्र रहात असल्यास त्यांना याशिवाय सामाजिक त्रास सहन करावा लागल्यामुळें तें अधिकच असह्य होतें. प्रथम उत्कट प्रेम असेल तर तें जन्मभर टिकणार असेंच सर्वांना वाटतें, पण अनुभव मात्र प्राप्तीनंतर वेगळाच येतो. पुष्कळ वेळां तें कांही महिन्यांत नाहीसें होतें आणि नंतर जन्मभर अेकत्र काढण्याची कल्पना देखील असह्य होते.

प्रेमिकांनी अेकत्र राहणें म्हणजे प्रेमाचा खून करणें होय. अेकत्र राहण्याने अेकमेकांचे दोष ठळकपणें लक्षांत येतात. शारीरिक दोषांपेक्षां स्वभावांतील दोष अधिक जाचक होतात. नशिबाने दोघांचेही स्वभाव आणि प्रवृत्ति अेकमेकांशीं जमवून घेण्याचीं असतील, तर भांडणावर येणार नाही आणि प्रेम नाहीसें झालें तरी स्नेह शिल्लक राहील. पण स्वभाव जर जुळते नसतील, तर हा अेकत्र वास असह्य झाल्याशिवाय रहात नाही. हा अनुभव प्रथमच प्रेमांत सांपडलेल्या तरुणांनाही येतो, मग अनुभवी लोकांची काय स्थिति होत असेल याची कल्पनाही करणें कठिण. अशा वेळीं पूर्वीच्या प्रेमिकांशीं तुलना झाल्याशिवाय रहात नाही आणि या तुलनेचा निकाल नेहमी पूर्वीच्या प्रेमिकांच्या बाजूलाच कलतो, कारण चालू दुःखें नेहमी अधिक जाचक असतात. सारांश स्नेह टिकणें शक्य असतें, पण प्रेमाचा तो स्वभावच नव्हे. सर्वच वृद्ध जोडपीं हें कबूल करतील असें नाहीं, कारण त्यांत स्वाभिमानाचा प्रश्न येतो, परंतु वस्तुस्थिति प्रामाणिक माणसाला माहीत असते.

अेकनिष्ठ प्रेमाचा असा बोजवारा कां उडतो याचें अेकच कारण आहे. असें प्रेम मनुष्यस्वभावाला धरून आहे ही कल्पनाच मुळांत चुकीची आहे. विवाहबाह्य प्रेमाचे बाबतींत पुष्कळ वेळां असें घडतें की असे संबंध लवकरच तुटतात आणि नीतिबाज लोक त्याचा अर्थ असा करतात कीं जी स्त्री विवाहाशिवाय समागमाला तयार होते, तिच्याबद्दल पुरुषाला लवकरच तिरस्कार वाटूं लागतो. हें कारण खोटें आहे. खरें कारण असें कीं पक्वान्न कितीही चांगलें असलें तरी तेंच तेंच खाण्याचा लवकरच वीट येतो. विवाहांतही तीच स्थिति होते, आणि पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांचीही होते, कारण नावीन्याची गोडी संवयीनें नाहीशी होणें हा मनुष्यस्वभाव आहे. पण विवाहांत पतिपत्नींना अेकमेकांना सोडून जाण्याची समाजाची परवानगी नसल्यामुळें तें कबूल करतां येत नाहीं. तरीही समाजाची परवा न करतां अेकमेकांना सोडून गेल्याचीं उदाहरणें घडतातच. पण अेकंदरींत चालू समजुतीमुळें स्त्रियांना विवाहांतच सुरक्षितता असते. यामुळें स्त्रिया सोडून गेल्याचीं उदाह-

रणें कमी घडतात. प्रेमाला अडथळा आल्यानें तें वाढतें आणि तृप्तीने कमी होतें, हें साधें तत्व पुष्कळांना कळत नाहीं, यामुळेंच आईबाप पुष्कळ वेळां मुलांच्या मार्गात अडथळे आणतात आणि यामुळे अेकनिष्ठ प्रेमाला भलतेंच महत्व मिळतें. दुर्मिळ वस्तूंचा संग्रह करणारांना हा अनुभव पुष्कळ वेळां येतो. एखादी वस्तु मिळेपर्यंत तीकरतां पाहिजे ती किंमत द्यायला ते तयार असतात, पण ती अेकदां हस्तगत झाल्यावर तिच्याकडे ढुंकून पाहण्याची त्यांना आठवण रहात नाही. पत्नी कितीही सुंदर असली तरी तिचीही तीच स्थिति होते. पतीला संवयीमुळें तिचें सौंदर्य दिसत नाहींसें होतें, परंतु अितरांना मात्र तें अप्रतिम वाटतें आणि यामुळें तिला भुलवण्याचे प्रयत्न होतात आणि तिलाही संवयीने पतीचा कंटाळा आल्यास व्यभिचाराला हे मोठें कारण होतें. सारांश अेकनिष्ठ प्रेम मनुष्यस्वभावाला धरून नसतांही तें त्यावर लादण्याचे प्रयत्न केल्यामुळें ते असफल होतात यांत आश्चर्य नाही.

स्त्री स्वतःचें शरीर पतीला अर्पण करते, अशी भाषा क्रिस्ती धर्माप्रमाणेंच हिंदु धर्मातही आहे ( अर्पियलें या शरिरा। तया लोकधनुर्धरा ). परंतु ही भाषा अर्थातच खोटी आहे. अेका व्यक्तीचें शरीर दुसरीच्या मालकीचें झाल्यास ती गुलामगिरी समजली पाहिजे, परंतु समंजस लोक या अर्पणाचा असा अर्थ घेत नाहीत. स्त्रीच्या शरीरावर पतीचा अधिकार फक्त समागमापुरताच असतो आणि जबरदस्ती करणें नसल्यास समागम तिच्या संमतीनेच झाला पाहिजे. पण कायद्यानें मात्र विवाहित स्त्रीच्या संमतीची जरूरी नसते आणि स्वतःच्या पत्नीवर कायद्यानें बलात्कार होऊंच शकत नाहीं, कारण कायद्याने तिची संमति नेहमीच गृहीत धरलेली असते. घटस्फोटाच्या कायद्यांत पतीची मालकी गृहीत धरलेली नसते आणि शिवाय कायद्याने स्त्रीचा व्यभिचार हा तिचा गुन्हा होत नाही, तेव्हां तिला आपलें शरीर तात्पुरतें वाटेल त्याला देण्याचीही कायद्याने परवानगी आहे.

शरीराचें दान तात्पुरतें तरी असतें, मनाचें तात्पुरतें देखील नसतें.

दोघांचे देह वेगळे, पण मन अेकच, असें वर्णन कवि करतात, पण दोघांचें कितीही प्रेम असलें तरी हें अशक्य आहे, असें दाखवणारी अेक गोष्ट बुद्धाच्या चरित्रांत आहे. अेका राजाचें व राणीचें अेकमेकांवर अतिशय प्रेम होतें, पण त्यांनी अेकदां त्याचें पृथक्करण करून पाहिलें, तेव्हां त्यांना असें दिसलें की प्रत्येकाचें प्रेम स्वतःवरच सर्वांत जास्त होतें. त्यांना मोठें आश्चर्य वाटलें आणि त्यांनी बुद्धाला जाऊन विचारलें कीं हें असें कसें? बुद्धाने सांगितलें कीं हा मनुष्यस्वभाव आहे. अेकनिष्ठ प्रेमिकांना हें पटत नाही, पण त्यांना अेकमेकांची संवय झाल्यावर हें सहज पटूं लागतें.

स्वतःच्या दानाचें महत्व वाढवण्याकारतांच स्त्रियांनी योनिमार्गांतील पडद्याला फाजील महत्व दिलें आहे, कारण तो अेकदां फाटला म्हणजे पुन्हा येत नाही. लग्नाच्या बाजारांत किंवा वेश्यांच्या बाजारांत या पडद्याला भाव अतिशय असतो. जिचें कौमार्य नाहीसें झालें ( म्हणजे हा पडदा फाटला ), तिची किंमत लग्नाच्या बाजारांत शून्य होते, कारण चारित्र्य काय तें या पडद्यावर अवलंबून असतें अशी समजूत आहे. वेश्यांच्या बाजारांत जरी किंमत शून्य न झाली, तरी ती बरीच उतरते यांत शंका नाही, कारण हा पडदा फाटला नसल्यास तिच्याशीं प्रथमसमागमाकरतां धनिक लोक पाहिजे तितका पैसा ओतायला तयार असतात. वास्तविक हा आचरटपणा आहे. कॅसानोव्हासारख्या अनुभवी लोकांनी असें मत दिलें आहे कीं हा पडदा म्हणजे अेक त्रासच असतो, तो नसलेलाच बरा.

कलावंतांचे बाबतींत तर अेकनिष्ठ प्रेम टिकणें जवळजवळ अशक्य असतें, कारण त्यांचें लक्ष नेहमी आपल्या कलेकडे असतें आणि त्यांना नावीन्याची किंमत अधिक वाटते. बर्नार्ड शॉने कलावंतांविषयीं लिहिलें आहे की कलावंताला आपली बायको उपाशीं राहिली, मुलांना अनवाणी चालावें लागलें, किंवा सत्तर वर्षांच्या आअीला भीक मागून पोट भरावें लागलें, तरी त्याची बिलकुल परवा नसते. तो आपल्या कलेंतच दंग असतो.

---

# पुण्याचें साहित्यसंमेलन

मेच्या १४ तारखेपर्यंत पुण्याची हवा थोडीबहुत थंड होते असा नेहमीचा अनुभव, पण या वर्षी तो खोटा ठरला. उष्णता अितकी होती की अंगाची लाही होत होती आणि अेस. पी. कॉलेजसारखें आवार मुंबअीस पहायला देखील मिळत नाहीं हें जरी खरें, तरी त्यामुळेंच आम्हाला चहाला आणि जेवणाला कडक उन्हांतून दहा मिनिटें चालल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. जागा मात्र भरपूर होती, तरीपण प्रतिनिधींचे हाल व्हायचे ते झालेच. अितके लोक जमतील ही कल्पनाच कार्यकर्त्यांना झाली नाही, यामुळें आवाराच्या जवळच्याच अेका दुकानांत भोजनाची व्यवस्था केलेली असतांही भयंकर गर्दी असल्यामुळें तें भोजन केव्हां पदरांत पडेल याची खात्री नव्हती आणि बऱ्याच लोकांनी पैसे भरलेले असून देखील त्यांना अितरत्र जावें लागलें. संमेलनाचा मुख्य अनुभव म्हणजे आम्ही तीन दिवस पुण्यांत भाजून निघालों अेवढाच.

अितर दृष्टींनी देखील हाल कमी झाले नाहीत. अध्यक्षांनी आपल्या भाषणांत सांगितलेले विचार ते आज अनेक वर्षें मांडीत आलेले असल्यामुळें त्यांत नावीन्य बिलकुल नव्हतें आणि या विचारांत बराच गोंधळ असल्यामुळें त्यांचें भाषण किती लोकांना समजलें असेल याची शंका आहे. ते उत्तम शिक्षक आहेत असें शिफारसपत्र त्यांना लोकमान्यांच्या पां. वा. गाडगिळांनी दिलेलें होतें, तरी त्यांचें भाषण अैकून असेंच वाटलें की त्यांनी आपल्या डोक्यांतला गोंधळ गाडगिळांच्या डोक्यांत उत्पन्न केला असावा. गांधीवाद मार्क्सवाद, सत्याग्रह, संतांची अध्यात्माची शिकवण, या सर्वांची ते खिचडी करीत होते, पण तींत कांही स्वाद उत्पन्न होत नव्हता. शिवाय त्यांचा आवाज अत्यंत कर्कश असला तरी त्यांचें स्वतःचें त्यावर अत्यंत प्रेम असल्यामुळें त्याच त्याच गोष्टी दहा वेळां, पंचवीस वेळां, सांगून झाल्या

तरी त्यांना भाषण संपवावेंसें वाटेना आणि अध्यक्षांना कोणी बंद करूं शकत नसल्यामुळें श्रोत्यांचे अतिशय हाल झाले. समारोपाच्या वेळीं देखील पुन्हा तोच अनुभव. त्याच गोष्टींची आणखी दहावीस वेळां पुनरावृत्ति. सर्व श्रोते कासावीस झाले तरी त्यांचें चऱ्हाट चालूच.

आणखी अेक कंटाळवाणें भाषण म्हणजे साने गुरुजींचें. त्यांनी अेका स्वप्नाला 'प्रांत-भारती' असें नांव देऊन त्याला संमेलनाची संमति घेतली. हे जावडेकरांप्रमाणेंच गांधींचे चेले असल्यामुळें त्यांना मर्यादा घालणें कठिणच होतें, परंतु तरीदेखील अध्यक्षांना घंटा वाजवावी लागली, अेरवीं तें भाषण कधीं संपले असतें की नाही याची वानवाच. सर्व प्रांतांच्या भाषा, कला, संस्कृति, यांचा अभ्यास सर्वांनी करावा, असा त्या स्वप्नाचा आशय होता. त्याला म. म. पोतदारांनीं 'हें स्वप्नच आहे, बोलाचाच भात, बोलाचीच कढी,' असें म्हणून त्याला संमति द्यायाला कांहींच हरकत नाहीं असें सांगितलें. अर्थात् कोणीही विरोध केला नाही, पण या जमावापुढे बोलण्याची संधि मिळण्यापलीकडे साने गुरुजींनीं काय साधलें हें कळत नाहीं. त्यांची बोलण्याची पद्धत अतिशय कंटाळवाणी आहे, आणि बोलतांना त्यांची मान अेकसारखी हालत असल्यामुळें ती मोडेल की काय अशी भीति आम्हांला वाटत होती.

बाकीचे ठराव मामुली स्वरूपाचे होते, तरीदेखील पुणें विद्यापीठ स्थापन झाल्याबद्दल समाधान व्यक्त करणाऱ्या ठरावांत कांही शब्द मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधि प्रि. खाड्ये यांना मुंबई विद्यापीठाला अपमानकारक वाटल्यामुळें ते काढून टाकावे असें त्यांनी सुचवलें. आयत्या वेळीं ठरावांत कोणताही फरक करतां येत नाही असा घटनेचा नियम आहे, तरीदेखील बऱ्याच लोकांनी आरडाओरड केल्यामुळें ते शब्द गाळले असें अध्यक्षांनी जाहीर केलें. हें अक्षम्य आहे. घटनेचें उल्लंघन करण्याचा अधिकार अध्यक्षांना बिलकुल पोंचत नाही.

---

# दोन मराठी बोलपट

१ '**मोरूची मावशी**'. हा हास्यपट आहे. याचें कथानक 'चार्लीज आँट' या इंग्रजी पटावरून घेतलें आहे. विनोदी पटांत कांहीही चालतें, त्यांत विशेष तारतम्य पहायचें कारण नाही, अशी अनेकांप्रमाणें अत्र्यांचीही कल्पना दिसते, परंतु आमचे मतें तारतम्य कोठेंही पहावें लागतें. यांत बी. अे. ला बसलेले दोन मुलगे व दोन मुली दाखवल्या आहेत, पण त्यांचें तसें वय प्रेक्षकांना दिसत नाही. या मुलांवर देखरेख करणारीं माणसें म्हणजे अेका मुलाचा चुलता, दुसऱ्याची मावशी व दोन्ही मुलींचा चुलता हीं तिघें आहेत. ही मावशी अेका लहानशा संस्थानची विधवा राणी असते. ती येणार अशी सूचना मिळाल्यानंतर ती वेळेवर आली नाही म्हणून, आणि कोणीतरी बाअी असल्याशिवाय मुली मेजवानीला येणार नाहीत म्हणून, मुलांनीं अेका स्नेह्याला राणीचा वेश देण्याची युक्ति काढली. हें काम दामुअण्णा मालवणकरांना दिल्यामुळें तें यशस्वी होणारच अशी सामान्य समजूत दिसते, पण स्त्रीवेश देणेंच असेल तर तो साजेल अशा माणसाला द्यावा असें आमचें मत आहे. पण दामुअण्णा म्हणजेच विनोद, अशी कल्पना रूढ झालेली आहे. या वेशधारी दामुअण्णांवर किंवा राणीसाहेबांच्या वैभवावर दोन्ही चुलत्यांचें प्रेम बसून मुलींचा चुलता त्यांना मागणीच घालतो. हें सोडून दिलें तरी हे गृहस्थ पुरुषवेशांत असतांना अेका स्त्रीचें त्याच्यावर प्रथमदर्शनी प्रेम बसलें असें दाखवलें आहे, तें खरें वाटणें कठिण आहे. मुलाच्या चुलत्याचें काम अत्र्यांनीं स्वतः केलें आहे. त्यांची व खऱ्या राणीसाहेबांची कॉलेजांतली ओळख असून प्रेम होतें व तें शेवटीं फलद्रूप होतें असें दाखविलें आहे. खऱ्या राणीसाहेबांचें काम दुर्गा खोट्यांनी केलें आहे, तें मात्र त्यांच्या लौकिकाला शोभेसें आहे. ज्यांना भरपूर हंसायला पाहिजे असेल, त्यांनी हा बोलपट जरूर पहावा.

२. '**मीठभाकर**' हा भालबा पेंढारकरांचा बोलपट उत्कृष्ट झाला आहे. पात्रांची निवडही चांगली आहे व कथानक हृदयस्पर्शी आहे. यांत मुख्यतः एक प्रेमळ शेतकरी कुटुंब असून त्यांत बाप आणि तीन मुलगे आणि या सर्वांच्या चार बायका इतकीं माणसें आहेत. यांतला मधला मुलगा शिकलेला म्हणून तो शेती न करतां नोकरीकरतां विलासपूरला जातो आणि तेथें एका चोरट्या जुगाराच्या अड्ड्यांत नोकरीला राहतो. तो प्रामाणिक असल्यामुळें संकटांत सांपडतो आणि त्याला सोडवून आणण्याकरतां शेतीवाडी विकून सर्व कुटुंब विलासपूरला जाऊन त्याच मालकाकडे नोकरी करूं लागतें. मधल्या मुलावर खुनाचा खोटाच आरोप आलेला असतो, पण ज्याच्या खुनाचा आरोप आहे, तोच मनुष्य जिवंतपणीं वावरतांना दिसल्यामुळें सर्वांची सुटका होऊन शेतीवाडी परत मिळते. ज्या (पॅथे) पटगृहांत हा बोलपट दाखवला जात आहे, त्यांतील यंत्रच वाईट असल्यामुळें म्हणा, किंवा तें वापरणारे वाकबगार नसल्याळें म्हणा, भाषणें स्पष्ट ऐकूं येत नाहीत, यामुळें त्यांतील स्वारस्य अर्धेअधिक कमी होतें. पॅथे हें एकेकाळीं नांवाजलेलें पटगृह होतें, त्याची अशी दशा कां व्हावी हें समजत नाही.

---

# जपान जागा झाला–हिंदुस्थान घोरत आहे

'युनायटेड प्रेस ऑफ अमेरिका' या वृत्तसंस्थेनें अशी बातमी दिली आहे की जपानी सरकार संततिनियमनाचा पुरस्कार करीत आहे. सरकारमार्फत अेक चित्रपट तयार होऊन तो सर्व देशभर दाखवला जात आहे, त्यांत संततिनियमनाची जरूरी व साधनें दाखवलीं आहेत. या चित्रपटांना विशेषतः स्त्रियांची गर्दी होत आहे. कांहीं रासायनिक साधनेंही सरकारनें

पसंत केलीं आहेत. कित्येक शतकांपूर्वी संततिनियमनाची माहिती नसल्यामुळें आणि अन्नाची टंचाई असल्यामुळें कांहीं लहान मुलें उपजल्याबरोबर मारून टाकण्याची पद्धत होती, हें अेका चित्राच्या द्वारें दाखवून नंतर शेतकऱ्यांना दिलेलें व्याख्यान दाखवलें आहे. अेका शेतकऱ्याची बायको प्रश्न विचारते कीं मुलें ही अीश्वराची देणगी आहे, त्यांना जन्माची संधि नाकारणें म्हणजे भयंकर पाप नव्हे काय ? व्याख्याता डाक्तर सांगतो की जपानला सध्यांपेक्षां जास्त लोक पोसतां येणार नाहींत आणि मुलें कमी असल्यास त्यांच्या शिक्षणाची व सर्व प्रकारची सोय अधिक चांगली करतां येअील.

संततिनियमनाने लोकांची नीति बिघडेल, हा गांधींचा आक्षेप देखील वादविवादांत अेका स्त्रीने घेतला. तिला अेका स्त्रीनेच उत्तर दिलें की नीति ही वैयक्तिक वागणुकीवर अवलंबून असते, संततिनियमनावर नव्हे. नंतर एक नवीन लग्न झालेलें जोडपें अेका संततिनियमनकेंद्रांत जातें. तेथील डाक्तर त्यांना संततिनियमनाची पूर्ण माहिती देतो आणि 'वैवाहिक जीवन सुखी कसें होअील हें आम्हांला आतां समजलें,' असे त्या जोडप्याचे उद्गार चित्रपटाचे शेवटीं दिले आहेत.

आमचें सरकार जागें होअील काय ?

---

# पत्रव्यवहार

आक्टोबर १९४८ चे अंकांत 'ब्रह्मचर्याचे दुष्परिणाम' यांत हल्लीच्या क्लीबनीतीच्या प्रसारामुळें विशेषतः ज्यांची कामेच्छा शाबूत असेल अशा वयातीत माणसांना तिची पूर्ति करणें अतिशय कठिण जातें, आणि यामुळेंच त्यांचा अेकंदर हुरूप नाहीसा होतो,' असें आलें आहे. त्यावर पृच्छा १. कामेच्छेची पूर्ति करणेंस कठिण कां जावें ? २. विवाहित गृहस्थाची पत्नी तयार नसल्यास हा प्रसंग सर्व वयांतच येत नाही कां ? ३. वयातीतांना

सुद्धां बाहेरख्यालींत अडचण येणेचें कांही कारण दिसत नाही. तेथें फक्त जरूरीप्रमाणें पैसा पाहिजे. ४. हें ज्या वयातीतांना जमत नसेल, त्यांना या गैरसोयीमुळें ॲनॅटॉल फ्रांसचे मताप्रमाणें जीवित व्यर्थ वाटत असेल, आणि ही गोष्ट सदैव ध्यानीं आली तर त्यांचें आरोग्य आणि आयुष्य कमी होण्यास कारणीभूत होत असावी. ५. अशा वयातीतांपैकीं कांहींना संयम जमणें जरा अधिक शक्य वाटत असावें. अशा लोकांनी अन्य गोष्टींकडे अधिक लक्ष देऊन कामेच्छेकडे दुर्लक्ष केल्याचा प्रयत्न अैकिवांत आहे कां? असल्यास त्यांना कितपत यश येत असेल? ६. अन्य कांही मार्ग त्यांना कोणी सुचवूं शकेल का? ७. अशा कारणाने कोणां आत्महत्या केल्याचें उदाहरण आहे का?. ८. हे मनोविकार मेंदूचे विकारावर आधारलेले असल्यास आमचेपुढे अेका तरुणाचा नमुना आहे तो असा. अेका आफिसराला मध्य वयांत मेंदूचा विकार उत्पन्न झाला, पुढें तो नीट होऊन जवळजवळ पेन्शनपर्यंत ठीक होतें, पण पुनः तो विकार बळावला. या वेळीं डाक्तराचे मतें त्याचे सांनिध्यांत स्त्री बिलकुल असतां कामा नये, परंतु तें जमलें नाही व त्यास वेड्यांचे अिस्पि-तळांत ठेवणें प्राप्त झालें आणि आतां त्याच्या परिचितांस भेटण्याची मनाई आहे. या आफिसराच्या मोठ्या मुलाचा अेका अत्यंत मंदकाम वधूशीं विवाह झाला आहे. तोही आपल्या क्षेत्रांत कर्तबगार आहे. पत्नीपासून कामपूर्तीचे व पुत्रप्राप्तीचे अभावीं त्यास जीवित व्यर्थ वाटतें. त्याचें आपल्या पत्नीवर प्रेम आहे व तो तिच्याशीं निष्ठेने वागतो. माझे मतें हा गृहस्थ नवविचाराचा असता तर त्यास कामपूर्ति अन्यत्र मिळवतां आली असती व पत्नीबरोबरही ठीक राहतां आलें असतें. परंतु हा मार्ग त्यास पटणें शक्य नाही आणि कोणी सुचवीतही नाही. त्याचें अेकंदर वागणें विक्षिप्तपणाचें वाटण्याजोगें आहे, यामुळें सुशिक्षित व कर्तव्यदक्ष पत्नीही अत्यंत उदास असते. हा प्रकार कामपूर्तीचे अभावीं, की आनुवंशिक असावा? ९. आपल्या पत्नीस विषमज्वराने किंवा अशाच भारी दुखण्यामुळें कमरेखालीं पंगुत्व आलें, आणि आपण निपुत्रिक आहांत असेंही आपल्या मासिकांत येऊन

गेलें आहे. यामुळें पुढील प्रश्न पुढें येतात. कामशास्त्राच्या देशी-विदेशी वाङ्मयाचा अितका अभ्यास व निरीक्षण असूनही आपण निपुत्रिक कसे ? की पुत्रप्राप्तीचे संशोधनांतच हा अभ्यास झाला ? की कांही काल आशा आणि पुढें चौकशींतच वय संपलें? विचारण्याचा हेतु आपलें कोणतेंही व्यंग असल्यास तें समजावें हा नव्हे, आपल्या परिस्थितींतून दुसऱ्यास कांही शिकतां आलें तर पहावें हा आहे. १०. आपणां उभयतांस पुत्रप्राप्तीची इच्छा आणि आतुरता होती का ? ११. अशा प्रसंगीं दुसरा विवाह करणाऱ्या पुरुषांचीं अनेक उदाहरणें आहेत आणि त्यास कित्येकदां पहिल्या पत्नीची अनकूलता किंवा आग्रहही असतो. याबबत आपली विचारसरणी कशी आहे ? १२. कामपूर्तीचे बाबतींत आपली परिस्थिति कशी राहिली ? त्यांतून वयातीत गृहस्थांना काय धडा घेणें शक्य आहे ? १३. 'केसरी' पत्रांत 'चलती दुनिया' हा अेक नवीन मथळा सुरू झाल्याचें दिसतें. १-३-४९ चे केसरींत या मथळ्याखालील मजकुरांत प्रिन्स अलीखान यांच्या नव्या पत्नीची हकीकत आली आहे. हिज हायनेस आगाखान हे धर्मगुरु असून त्यांच्या पत्नी युरोपीय आहेत. वडिलांचाच कित्ता चिरंजीव गिरवतात असें दिसतें. त्यांनी प्रथम अेका अिंग्रज स्त्रीशीं लग्न केलें, आतां काडीमोड करून सिनेमा नटी 'रिटा हेवर्थ' शीं लग्न करणार असें दिसतें. ही वार्ता केसरीने कां प्रसिद्ध केली हें कोडेंच आहे. हें केसरीच्या ध्येयाशीं सुसंगत वाटतें का ? कीं द्विपत्नीकत्व, कीं परप्रांतीय, कीं घटस्फोट, कीं या सर्वच बाबी वाचकांचे ध्यानीं याव्या म्हणून प्रसिद्धि दिली ? हें केसरीच्या वाचकांना कितपत रुचत असेल ? आपल्या मतें हा प्रश्न फक्त दोन व्यक्तींचा, त्यांत अितरांस पडण्याचें काय कारण ?...

उ. १. कामपूर्तीचे मार्गांत अनेक अडचणी येतात. २. पत्नी तयार नसणें हें वयातीतांचे बाबतींत जास्त शक्य असतें, कारण पत्नीचेंही वय झालेलें असतें आणि मासिक स्राव बंद झाल्यावर कांही स्त्रियांची कामेच्छा अजीबात नाहीशी होते. तारुण्यांत देखील कांही गांघाळलेल्या स्त्रियांना असें

वाटणें शक्य आहे की समागम प्रजोत्पत्तीपुरताच असावा, परंतु असें असल्यास तिला कामेच्छा मूळचीच कमी असावी. परंतु वयातीतांवर मात्र असा प्रसंग पुष्कळ वेळां येतो. ३. वयातीतांना पैशाची अनुकूलता सामान्यतः तरुणांपेक्षा जास्त असते, परंतु केवळ पैशाने भागत नाही. वयाबरोबर पुष्कळांना थोडाबहुत दर्जा प्राप्त झालेला असतो, किंवा निदान त्यांना पुष्कळ जास्त लोक ओळखण्याचा संभव असतो, यामुळें उघडपणें वेश्यांकडे जाणें जमत नाही, कारण समाजाची भीति सर्वांनाच वाटते. वेश्यांशिवाय अितरत्रही कामपूर्ति होणें अशक्य नसतें, परंतु तें नेहमीच जमतें असें नाही आणि तेंही लोकांना समजण्याचा संभव असतोच आणि तसें झाल्यास अधिकच बदनामीचा प्रसंग येतो. गांव लहान असल्यास तेथें उघड वेश्या नसतातच आणि अितर सर्व भानगडी लोकांना कळण्याचा संभव जास्त. ४, ५, ६. संयमाचा उपदेश करणें सोपें असतें, परंतु तें सर्वांनाच जमत नाही. पन्नाशीच्या पुढच्या आयुष्यांत कोणी कामुकता दाखवल्यास त्याला कमी वयाचे लोक हंसतात. अेवढा थेरडा झाला तरी अजून संयम नाही म्हणजे काय ? तो मनुष्य अेकंदरींत वाअीटच, असें मानण्याची प्रवृत्ति असते, परंतु तें खरें नसतें. शारदा नाटकांतील म्हाताऱ्याची चेष्टा सर्वच म्हाताऱ्यांना पसंत पडते असें नाही. वस्तुतः कामेच्छा ही चांगल्या प्रकृतीची खूण आहे आणि प्रकृति चांगली राहणें हा दोष नव्हे. कोणालाही आपल्या मर्जीप्रमाणें संयम राखतां येतो, हा भ्रम आहे. फाजील खाण्याच्या संवयीने ज्यांना नेहमी त्रास होतो, त्यांना देखील जिभेवर ताबा ठेवणें जमत नाही, पण अशा लोकांपेक्षा कामुकांना हंसण्याची प्रवृत्ति जास्त दिसते. यामुळें वयातीतांना कामुकता लपवून ठेवण्याचा प्रयत्न करावा लागतो व यामुळें जास्तच त्रास होतो. वास्तविक 'मनावर ताबा ठेवणें' याचा कांही अर्थच होत नाही. मनावर कोणाचा ताबा चालेल ? आत्मा वगैरे काल्पनिक गोष्टींवर ज्यांचा विश्वास नाही त्यांना तरी हे शब्द निरर्थकच वाटतील. अर्थात् ज्यांना कामपूर्ति शक्य नसते, ते अितर गोष्टींत लक्ष घालण्याचा प्रयत्न

करतातच, पण तो यशस्वी होतोचं असें नाही. याची चर्चा चालू अग्रले-खमालेंत येणार आहे. अन्य कांही मार्ग आम्हास तर दिसत नाही. साठी उलटलेल्या प्रतिष्ठित गृहस्थांनी आम्हास या बाबतींत सल्ला विचारलेला आहे, यावरून ही अडचण केवळ काल्पनिक नाही, पण साठीच्या पुढच्या लोकांना ही अडचण खरोखर भासेल, हें कमी वयाच्या लोकांना खरें वाटत नाही. ते अशा म्हाताऱ्यांना उल्लू समजतात. ७. अशा वेळीं आत्महत्या करणें शक्य आहे, परंतु आमच्या अैकिवांत असें उदाहरण नाही. कोणी केलीच, तर तो असें कारण लिहून ठेवणार नाही. फक्त 'जगण्याचा कंटाळा आला,' अितकेंच लिहील. ८. वर सांगितलेंच आहे की कामेच्छा ही चांगल्या प्रकृतीची खूण आहे, ती विकृति नव्हे, पण कामतृप्ति न झाल्यास वेड लागणें शक्य असतें, आणि वेड्यांचीं अिस्पितळें ज्यांनी पाहिलीं असतील, त्यांना याचा पुरावा शोधावा लागणार नाही. रस्त्यांत देखील कांहीं वेडे बडबड करीत असलेले आढळतात आणि तींत 'अश्लील' शब्दांची रलचेल असते. ही गोष्ट विशेषतः स्त्रियांच्या बाबतींत लक्षांत येते आणि याचें कारण अितकेंच की भाषेच्या बाबतींत स्त्रियांना नेहमी पुरुषांपेक्षां अधिक संयम बाळगावा लागतो, यामुळें स्त्रीला वेड लागल्यास तिच्या मनांत पूर्वी दबून राहिलेले 'अश्लील' शब्द आणि विचार अधिक प्रमाणांत बाहेर पडतात, कारण स्त्रियांचा विनय नैसर्गिक नसतो, शिक्षणाने त्यांच्यावर पुरुषांपेक्षां अधिक संयम लादलेला असतो आणि हें यावरून स्पष्ट दिसतें. वेडाच्या मुळाशीं पुष्कळ वेळां अतृप्त कामवासनाच असते, याचा हा पुरावा आहे. सदर अधिकाऱ्याच्या मुलाची विक्षिप्त वागणूक यामुळेंच असावी. त्याला कामविषयक स्वातंत्र्य मिळेल तर तो नीट वागेल असें मानण्यास जागा आहे. पत्नीला पुष्कळ वेळां हें कळत नाही आणि कळलें तरी देखील पत्नी या बाबतींत स्वातंत्र्य देण्यास तयार असतेच असें नाही. जुन्या काळच्या स्त्रिया असें स्वातंत्र्य देत असत ( कदाचित् नाअिलाज म्हणूनही असेल ), पण हल्लीच्या समान हक्कांच्या काळांत आधुनिक स्त्रिया असें

स्वातंत्र्य खुशीने देण्याचा संभव कमी. अितकेंच नव्हे तर एखाद्या नवऱ्याने असें स्वातंत्र्य घेतल्यास कांही स्त्रिया त्याचा गांवभर पुकारा करून त्याची बदनामी करण्यासही मागेपुढें पहात नाहीत. बापाच्या वेडांतही मूळचा कांही मेंदूचा दोष असेलच असें नाही व तसा नसल्यास मुलाचा दोष आनुवंशिक नव्हे हें उघड आहे. ९. आमचे पत्नीस रक्तक्षयानें (परनिशिअस ॲनीमिया) पंगूपणा आला होता. १०. आमचा कामशास्त्राचा अभ्यास विवाहापूर्वी निदान दहा वर्षांपासून चालू होता. आम्हा दोघांसही पुत्रप्राप्तीची आतुरता कधींच नव्हती. कित्येकांना धार्मिक कारणांकरतां पुत्र पाहिजे असतो, कित्येकांना वारस पाहिजे असतो. आम्हा दोघांपैकी कोणीच धार्मिक नव्हतें व मिळकतच नसल्यामुळें वारसाला काय मिळणार? पुष्कळ स्त्रियांना निसर्गतः अपत्याची उत्कट इच्छा असते, पण त्यांतही कांही अपवाद असतात, व पुरुषांना अपत्याची अिच्छा असलीच तर ती आगंतुक कारणांमुळेंच असते. त्यांतून आमची आर्थिक परिस्थितिही कधींच विशेष चांगली नव्हती, आणि ती नसेल तर मुलें नसलेलींच बरीं असें वाटणें साहजिक आहे. अर्थात् संततिनियमनाची जी पद्धत आज विशेष यशस्वी समजतात, ती प्रथम आम्हास माहीतच नव्हती, आणि जे कांही तुटपुंजे उपाय आम्ही वापरले, ते फसून मूल होणें अशक्य नव्हतें, पण तें झालें नाही. याचें कारण शोधण्याची जरूर आम्हास वाटली नाही, पण डाक्तरी चिकित्सेशिवाय स्वतःलाच समजेल असें कांही कारण नव्हतें, अितकेंच मी सांगूं शकतों. तसें चुकून मूल झालें असतें तर मला सरकारी नोकरी सोडण्याची छाती झाली नसती, कारण एकदां कुटुंबाची जबाबदारी पतकरली म्हणजे जरूर तर अपमान सोसूनही शक्य तर कुटुंबाबर दारिद्र्यांत राहण्याचा प्रसंग येऊं देऊं नये असें माझें मत आहे. कित्येक लोक स्वार्थत्याग करण्याकरतां कुटुंबावर तसा प्रसंग आणतात, पण तें मला पसंत नाही. एखादे वेळीं पतिपत्नी दोघेंही स्वार्थत्याग करतात आणि त्यांना मुलें झाल्यास त्यांचे हाल होतात, तेंही मला पसंत नाही. अर्थात् सरकारी नोकरी सोडली नसती म्हणजे

आज मी पांचसातशें रुपये पेनशन खात बसलों असतों व कोणतेंही सामाजिक कार्य माझ्या हातून झालें नसतें. मुलें नसल्यामुळें मी स्वाभिमान राखण्याकरतां एकदां सरकारी नोकरी, व नंतर पुनः विल्सन कॉलेजांतील नोकरी सोडली, कारण बायकोच्या अंगांत स्वतःचें पोट भरण्याची ताकत होती व मला एकट्यालाच धोका होता. पण नंतर पत्नी आजारी पडल्यावर मला अपमान सहन करूनही नोकरी करीत रहावें लागलें आणि तीही प्रोफेसरकी नव्हे तर कारकुनी! तीही शेवटीं स्वाभिमानाकरतांच सोडली, पण अितर मार्गांनी आपलें पोट भरेल असें वाटल्यामुळें, तेथपर्यंत अपमान सहन केला, कारण पत्नीच्या आजाराचा भयंकर खर्च डोक्यावर होता. दोनदां नोकरी सोडल्यावर पुन्हा नोकरी मिळण्याचा संभव फारच थोडा होता, म्हणून त्या अवधींत संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेतली, कारण त्यानंतर मुलें होण्यांत मोठाच धोका होता. ११. दुसरा विवाह करण्याचे बाबतींत प्रथमपत्नीची जरी संमति असली, तरी भांडणें होण्याचा संभव असतोच, आणि खर्चाचाही प्रश्न असतो. त्यांत मला पाप वाटत नाही, पण दुसरी बायको करून तीही आजारी पडली तर? पण खरें म्हटलें म्हणजे दुसऱ्या लग्नाचा विचारच माझ्या डोक्यांत कधीं आला नाहीं. १२. पत्नीचे आजाराचे सुरवातीला माझें वय ४७ असल्यामुळें कामपूर्तीचे बाबतींत मला विशेष जाणवण्यासारखी परिस्थिति नव्हती, परंतु अितरांनी धडा घेण्यासारखें मी कांहीच केलें नाहीं, म्हणजे माझा स्वभाव भित्रा असल्यामुळें अितर कोणतीही व्यवस्था केली नाही. तसा उपदेश अनेकांनी केला, पण स्वभावाला औषध काय? १३. केसरीचा उद्देश उघड आहे. केसरी हिंदु आहे आणि अितरांची कुचेष्टा केल्यानें हिंदु श्रेष्ठ ठरतात. वस्तुतः अलीखान यांच्या नूतन विवाहाला त्यांच्या धर्मांत कोणतीही आडकाठी नाही. मुसलमानांना चार बायका करतां येतात अितकेंच नव्हे तर क्रिस्ती स्त्रीशींही लग्न करतां येतें. ते आपल्या धर्मांप्रमाणें व कुलपरंपराप्रमाणें वागले. यांत त्यांची कांहीच चूक नाहीं. हा दोघांचा प्रश्न आहे, त्यांत

तिसऱ्याने पडण्याचें कारण नाही, हें आमचें मत आहे, पण तें केसरीला कसें पसंत पडावें ? त्यांनी स्वतःच्या मताला अनुसरून बातमी दिली हें साहजिक आहे. **सं.**

---

# शारदेचें पत्र

येथें भरलेल्या सर्वधर्मपरिषदेंत विचारांचा घोटाळा आणि आचरटपणाचा कळस सांपडला तर त्यांत कांहीच नवल नाही आणि अपेक्षेप्रमाणें तो भरपूर प्रमाणांत सांपडला. औश्वरावर विश्वास हें धर्माचें अेक मुख्य तत्व सांगण्यांत आलें आणि खरें पाहिलें तर तो सर्व धर्मांत सांपडत नाहीं. बौद्ध धर्म, जैन धर्म, आणि खुद्द हिंदु धर्मांतला वेदांत, यांत औश्वर मानलेला नाहीं. असें असूनही सर्व धर्मांच्या वतीने औश्वरावर विश्वासाचा संदेश देणें म्हणजे धडधडीत खोटें बोलणें नव्हे काय ? धार्मिक लोकांना सत्याची मोठीशी पर्वा नसतें असाच त्याचा अर्थ आहे.

दुसरें अेक तत्व म्हणजे विचारस्वातंत्र्य. त्याचाही पुरस्कार धर्मांच्या वतीने करण्यांत आला. विचाराचें स्वातंत्र्य जर खरोखरच असेल, तर औश्वरावर विश्वास ठेवला पाहिजे हा सिद्धांत त्यांतून कसा निघेल ? औश्वर आहे की नाहीं, याचा निर्णय स्वतंत्रपणें करण्याची मोकळीक सर्वांना असली तरच त्याला विचारस्वातंत्र्य म्हणतां येअील. सर्व जगांत विद्वत्तेबद्दल प्रसिद्ध झालेले सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांना देखील या थापा आहेत हें समजूं नये काय ? हल्ली विचारस्वातंत्र्याला जगांत महत्व आलें आहे, तेव्हां आपणही त्याचा पुरस्कार करावा अशा बुद्धीने हा पुरस्कार केलेला दिसतो, पण हा प्रामाणिकपणा नव्हे, हें या विद्वानांना कळायला पाहिजे होतें. अेकंदरींत धार्मिक लोक लफंगे असतात, असाच निष्कर्ष या घोषणांवरून निघतो.

सभा कशी असूं नये, याचा नमुना जर कोणाला पहायचा असला तर ब्राह्मणसभेच्या दिवाणखान्यांत भरणाऱ्या अेखाद्या सभेला जाऊन पहावें.

तेथें जर अितके हाल होत नसते, तर भरपूर करमणूक झाली असती. परवां नुकतीच पुण्याच्या ज्ञानप्रकाशच्या शताब्दीच्या प्रसंगीं अभिनंदनाची जाहीर सभा तेथे भरली होती. पेशवाअी थाटाचा ब्राह्मणांना अजून विसर पडला नसल्यामुळें तेथें खुर्च्या नसतात. याचा परिणाम असा होतो की कांही दोन-चार शिष्टांना तक्के आणि लोड यांशीं टेकून लोळतां येतें, आणि बाकीच्यांना पायांची कशीतरी घडी करून बसावें लागतें आणि थोड्या थोड्या मिनिटांनी आपला पवित्रा बदलावा लागतो. शिस्तीचें नांवच आपल्याकडे जवळजवळ नाहीं, तेव्हां सभेंत आल्यावर कोठे बसावें याचा विचारच करायचें कारण नसतें. दारांत शिरल्याबरोबर दाराच्या शक्य तितक्या जवळ फतकल मारा-यची, म्हणजे पलीकडे रिकाम्या जागेपर्यंत कोणाला जायचें झालें, तर दारा-जवळच्या लोकांना पाय लावल्याशिवाय किंवा त्यांच्या पायांवर पाय किंवा डोक्यावर हात दिल्याशिवाय पलीकडे जातांच येऊं नये. पण हे दाराजवळचे लोक अितके निर्ढावलेले असतात की कितीही लोकांच्या लाथा लागल्या तरी त्यांना पर्वा नसते. ते म्हणून जागचे हालत नाहीत, किंवा पलीकडे जाण्याकरतां वाट ठेवावी हें त्यांच्या लक्षांत येत नाही. कांही शिष्टांना अध्य-क्षांच्या शेजारीं लोडाशीं बसतां यावें म्हणून समोर जाण्याकरतां वाट ठेवलेली असते, पण ती मोकळी जागा कोणाला पाहवत नाही. दर दोन मिनिटांनी तेथें येऊन बसणाऱ्या नवीन नवीन लोकांना उठवण्याकरतां अेक मनुष्य चालकांना ठेवावा लागतो. अर्थात् पेशवाअी थाटांत बसायचें म्हणजे जोडे, चपला, बूट बाहेर काढून ठेवावे लागतात आणि या महागाअीच्या दिवसांत ते चोरीस जायचे हें ठरलेलेंच, किंवा निदान चांगले जोडे जाऊन वाअीट शिल्लक रहायचे, म्हणजे ते पायांत घालण्यापेक्षां अनवाणी जाणें पुरवलें, असेंच कोणालाही वाटावें. महाराष्ट्रीय बहुधा दरिद्री असतात, तेव्हां कोणाच्या घरीं बसायला खुर्ची नसल्यामुळें जमिनीवर बसावें लागलें तर तें क्षम्य आहे, पण स्वतःच्या मालकीच्या दोन मोठ्या अिमारती असलेल्या ब्राह्मणसभेनें अितकें दारिद्र्य कां दाखवावें हें कळत नाही. अर्थात् पेशवाअी थाटाची आवड हेंच त्याचें

कारण असलें पाहिजे. पेशवे स्वतःचे जोडे सुरक्षित राखण्यासाठीं हुजरे ठेवीत असत, तशी अैपत नसल्यामुळें हल्लीं आमच्या मंत्र्यांचे देखील जोडे किंवा चपला चोरीस जातात. मला वाटतें महाराष्ट्रीयांच्या पाठीला हल्लीं कणा नसतो, म्हणूनच त्यांना तक्क्याशीं लोळायला पाहिजे असतें. पण तें मात्र कांहीं चारदोन शिष्टांनाच मिळतें आणि बाकीच्यांचे हाल होतात. याबद्दल कांही-तरी करायला पाहिजे हें कोणाच्या लक्षांतच येत नाही, उलट गांधीयुगांत ही जमिनीवर बसण्याची चाल वाढतच जात आहे. पण यांत कांही पुण्य लागतें असें मला तर वाटत नाही.

येथें नुकताच (अेप्रील २८) आचार्य जावडेकरांचा सत्कार झाला, तेव्हां पां. वा. गाडगिळांनी सांगितलें कीं ते अतिशय उत्तम शिक्षक आहेत, आणि त्यांनी गाडगिळांना मार्क्सवाद शिकवला. नंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशांनी सांगितलें की सत्यं, शिवं, सुंदरं, हीं तिन्ही अेकत्रच सांपडलीं पाहिजेत, असें जावडेकरांचें ठाम मत आहे. खरें पाहिलें तर या तिहींचा परस्पर संबंधच नाहीं. अितका ज्याच्या स्वतःच्या डोक्यांत गोंधळ आहे, तो मनुष्य उत्तम शिक्षक कसा असूं शकेल? गाडगिळांच्या डोक्यांत मार्क्सवादासंबंधी जो घोटाळा आहे, तो कोठून आला याचा मला आतां उलगडा झाला. जावडेकरांनी आपल्या भाषणांत सांगितलें की आपण सर्व ज्ञान अिंग्रजांकडूनच शिकतों आणि त्यांनाच आतांपर्यंत मार्क्सवादाचा अर्थ कळत नव्हता. आतां तो त्यांना कळूं लागला, तेव्हां आम्हांला कळूं लागला. मला वाटतें मार्क्स जरी जर्मन असला तरी त्याचा मूळ ग्रंथ अिंग्रजींतच आहे, मग त्याचा अर्थ सांगायला आणखी अितर अिंग्रज कशाला लागतात? खरी गोष्ट अशी की मार्क्सच्या स्वतःच्याच डोक्यांत बराच गोंधळ असल्यामुळें त्याच्या पुस्तकांतही गोंधळच आहे. त्याचा अर्थ जर जावडेकरांना कळला नव्हता, तर त्यांनीं गाडगिळांना काय शिकवलें? अितर अिंग्रज मार्क्ससंबंधी काय म्हणतात, हे त्यांनीं सांगितलें असावें असें दिसतें. आगरकरांकडून आपल्याला कांहीं मार्गदर्शन झालें

असें जावडेकरांनी सांगितलें, पण तें उपड्या घड्यावर पाणीच झालें असलें पाहिजे. म्हणजे घडा बाहेरून भिजला, पण पाणी आंत शिरलेंच नाही. आगरकरांच्या शिकवणीचें मर्म त्यांना समजलेलें दिसत नाहीं.

वामनराव जोशी देखील 'सत्यं, शिवं, सुंदरं'चा असाच घोटाळा करीत असत. आचार्य भागवतांनी अेकदां सांगितलें की आपल्याजवळ अध्यात्माचा पुरावा आहे, पण तो बुद्धीला पटेल असा नाहीं. सर्वत्र धुक्याचा प्रसार करणाऱ्या या लोकांची गणना आपल्याकडे मोठ्या विचारवंतांत होते, आणि हे आमचे शिक्षक होते म्हणून गाडगिळांसारखे लोक बढाअी मारतात. नशीब हिंदुस्थानचें !

' सर्वोदय कलापथक ' हें नांव चांगलें आहे, आणि त्याचे कार्यक्रमही कलेच्या दृष्टीने पाहण्यालायक आणि अैकण्यालायक असतात, हें जरी खरें, तरी तें नांव सार्थ नाही, कारण हें कलापथक कांग्रेसतर्फे आणि अितर पक्षां-विरुद्ध प्रचार करीत असतें, हें आतां सर्वांना माहीत झालें आहे. अेका पक्षाचा प्रचार करणाऱ्या लोकांनी अितर पक्षांना शिव्या द्याव्या हें साह-जिक आहे, परंतु अशा लोकांनी स्वतःच्या उच्च ध्येयाच्या घोषणा कराव्या हें अत्यंत हास्यास्पद आहे. गोंडस नांवानें त्यांतला हलकटपणा नाहीसा होत नाही. अशा या कलापथकाला सरकारी मदत मिळते असें समजतें. हें खरें असेल तर सरकार निर्लज्जपणाने जनतेच्या पैशाचा उपयोग अेका पक्षाच्या प्रचाराकरतां करतें असेंच म्हणावें लागेल. ही अेक प्रकारची अफरातफर आहे.

कांग्रेस म्हणजेच सरकार आणि सरकार म्हणजेच कांग्रेस, असें कांग्रेसवाले बिनदिक्कत धरून चालतात आणि राष्ट्रध्वजाचा स्वतःच्या पक्षाच्या वतीने दुरुपयोग करतात. पुण्याच्या कांग्रेसच्या अिमारतीच्या आवारांत अेक अशोकस्तंभ उभारला आहे असें म्हणतात. तें कदाचित् क्षम्य असेल आणि मीसुद्धां आपल्या घरीं कदाचित् अेक लहानसा अशोकस्तंभ उभारीन. पण निवडणुकीच्या वेळीं कांग्रेसपक्षाने राष्ट्रध्वज स्वतःचा ध्वज म्हणून वापरावा, हा अक्षम्य अपराध आहे आणि तो सरकारने चालूं देतां नये.

पण सरकार म्हणजेच कांग्रेस, तेव्हां याला अिलाज काय? ज्याला अितक्या स्पष्ट गोष्टी दिसत नाहीत, असें अरेरावी सरकार जितक्या लवकर नाहीसें होअील तितकें बरें, असेंच कोणाही समंजस माणसाला वाटेल.

कृष्णराव मराठ्यांना अश्लीलतेशिवाय कांही दिसतच नाही. जळीं स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं कांहीं लोकांना देव दिसतो, पण यांना अश्लीलता दिसते. त्यांचा देवच अश्लीलता आहे म्हणेनास? त्यांनी नेहमीप्रमाणें स्वतःच्या सोंवळेपणाची जाहिरात करण्याकरतां अश्लील जाहिरातींसंबंधी अेक ठराव पुण्याच्या साहित्यसंमेलनांत आणला होता, त्याच्या विरुद्ध कोणीं बोललें तर उगाच वाद माजून त्यांची अधिकच जाहिरात होअील, म्हणून तो ठराव अध्यक्षांनीच मांडावा, म्हणजे कोणालाच बोलायला सांपडणार नाही, अशा अटीवर विरोधकांनी गप्प बसायचें ठरवलें, आणि तो ठराव अध्यक्षांनी केव्हां वाचला तेंही कोणाला कळलें नाही. वास्तविक हें बरें नव्हे, पण अशा जाहिरातीच्या जोरावर आणि मुरारजी देसाअी स्वतः त्यांच्याच जातीचे असल्यामुळें कृष्णराव मराठे मुंबअीच्या बोलपटांच्या कातरीसमितीचे सभासद होऊन बसले होते आणि त्यांचें तेथून उच्चाटन व्हायला अतिशय त्रास पडला. अश्लीलतेचा कायदा आहेच आणि त्याखालीं मॅजिस्ट्रेट पाहिजे तें करूं शकतो, तेव्हां या ठरावाने अधिक कांहीच होत नाहीं, पण ही अक्कल कृष्णराव मराठ्यांना सुचली असती तर त्यांची जाहिरात कशी झाली असती?

पुण्याच्या संमेलनांत प्रतिनिधींना अितक्या गैरसोयी सोसाव्या लागल्या कीं ज्यांना म्हणून शक्य होतें त्यांनी पैसे भरलेले असून देखील तेथून पाय काढला. माझी अगदीं खात्री झाली कीं प्रतिनिधींची व्यवस्था आम्ही मुंबईकरांनीच ठेवावी? पुढच्या वर्षी दिसेलच.

तुझी **शारदा**

---

# स मा ज स्वा स्थ्य

## ( वर्ष २२ वें, जुलै १९४८ ते जून १९४९ )

## अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १. कौमार्याचा बडेजाव | १ |
| २. तिचा प्रियकर (गोष्ट) | ७ |
| ३. मॉतेन्यचे तात्विक विचार : जीवन व मरण | १२ |
| ४. पत्रव्यवहार, | १६, ३८, ६३, ८७, ११२, १३९, १६३, १८४, २३३, २५५, २७७ |
| ५. शारदेचीं पत्रें, | १८, ४३, ६६, ९०, ११५, १४०, १६५, १८६, २१२, २३८, २६२, २८४ |
| ६. आर्यसंस्कृतीचे मासले—५, | २३ |
| ७. किरकोळ | २४, ७२, १२० |
| ८. ब्रह्मचर्याचे दुष्परिणाम | २५, ४९, ७३ |
| ९. कामविषयक संशोधन | ३१ |
| १०. पुरुषांची घमेंड | ३६ |
| ११. आहाराविषयीं अेक गैरसमज | ४७ |
| १२. असोशी ( गोष्ट ) | ५४ |
| १३. गर्भपाताविषयीं विक्षिप्त मतें | ६० |
| १४. जर्मनींत गर्भपाताची भयंकर वाढ | ७१ |
| १५. वाढदिवस ( गोष्ट ) | ७७ |
| १६. चीनमधील झोटिंग पादशाही | ८६ |
| १७. शेक्सपिअरवरील अेक आरोप | ९५ |
| १८. काम आणि नीति, | ९७, १२१, १४५, १६९, १९३, २१७, २४३ |
| १९. वाढत्या लोकसंख्येचें संकट | १०४ |

## अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| २०. आफ्रिकेंतील मांत्रिक व जादूगार | १०९ |
| २१. जपानचें दारिद्र्य | ११० |
| २२. अेक करतां अेक! (गोष्ट) | १२७ |
| २३. 'अेक होता म्हातारा' | १३४ |
| २४. अहिंसकाची स्त्रीहिंसा | १३८ |
| २५. गांधीवाद आणि बुद्धिवाद | १४९ |
| २६. पं. नेहरूंचें अंकगणित | १५५ |
| २७. अमेरिकेंतील संस्कृति-संरक्षक | १५८ |
| २८. संत विरुद्ध मुत्सद्दी | १७४ |
| २९. वृद्धांची व्यवस्था | १७९ |
| ३०. आरोग्याचा विमा | १८१ |
| ३१. ग्रंथपरीक्षण | १८३, २५४ |
| ३२. 'जागा भाड्यानें देणें आहे' | १९१ |
| ३३. चिकित्सा (गोष्ट) | १९७ |
| ३४. श्री. प्रभाकर पाध्यांचा बुद्धिवादविरोध | २०३ |
| ३५. स्वराज्य कसें मिळालें? | २०९ |
| ३६. कायद्याचा गाढवपणा | २११ |
| ३७. गांधीजींच्या घोडचुका | २२३ |
| ३८. प्रभाकर पाध्यांची आणखी घसरगुंडी | २२७ |
| ३९. रशियांतील हुकूमशाही | २३० |
| ४०. काम आणि प्रेम | २४३, २६७ |
| ४१. समाजदर्शन (गोष्ट) | २४८ |
| ४२. थापाशास्त्राचे प्रपितामह | २५३ |
| ४३. पुण्याचें साहित्यसंमेलन | २७३ |
| ४४. दोन मराठी बोलपट | २७५ |
| ४५. जपान जागा झाला—हिंदुस्थान घोरत आहे | २७६ |

**समाजस्वास्थ्य** मासिक दर १४ तारखेला टपालांत पडतें. वर्गणी रु. ३, व्ही. पी. नें सवातीन. कोणत्याही महिन्यापासून सुरू करतां येतें.

## आमचेकडे मिळणारा माल

**लॅम्बर्ट डच कॅप,** रु. ६. **उभट टोपी,** रु. १॥. **राइट कॉंट्रॅसेप्टिव्ह जली,** रु. ३॥. **पिशव्या** ४ आणे, ८ आणे, रु. १, रु. १॥. **जेलोटयूब** (फ्रेंच रोग प्रतिबंधक) २ नळयांचे पेटीस रु. २. **राइटटयूब** (आम्ही बनवलेलें), नळीस १४ आणे.

**ल्यूटीज फार्माकल कं.** चीं होमिओपाथिक व इतर औषधें ( अमेरिकन ):—

**क्रमांक** १४ ( संधिवात, सायॅटिका, कटिवात, वगैरे ) रु. २–१२.
,, ६६ ( सौम्य सारक औषध ) रु. १.
,, १०५ ( अपचन, वायु धरणें, पोटदुखी ) रु. १-८.
,, १७७ (मुरुमाचे व इतर फोड, गळवें, एक्झेमा, वगैरे) रु. १-८.
,, १८३ (पडसें, इन्फ्लुएन्झा, ताप, डोकेंदुखी) रु. १-१४.
,, २५९ (फाजील रक्तदाब) रु. २–१२.

**सँग्वीना एलिक्सर** ( रक्तक्षय, अशक्तता, कृशता ) रु. ३–४.

**तेजवॉन** ( वॉनलेस फार्मसीचें ) शक्तिवर्धक, कामोत्तेजक, १ महिन्याचें औषध, रु. ६.

**राइट एजन्सी,** १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

Registered No. B 2289.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. **कैब्याची मीमांसा**, किंमत रु. ६, ट. ख. ७ आणे.
२. **आधुनिक आहारशास्त्र**, किं. १॥ रु., ट. ख. ६ आणे.
३. **आधुनिक कामशास्त्र** [ सचित्र ], चौथी आवृत्ति
किंमत रु. ४, ट. ख. ७ आणे.
४. **संततिनियमन** [सचित्र], २ री आ. १। रु. ट. ख. ५ आ.
५. **गुप्त रोगांपासून बचाव**, ४ थी आ. रु. १, ट. ख. ५ आणे.
६. **'समाजस्वास्थ्य'** मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४-५-६], किं. २-०-०, ट. ख. ६ आ.
७. **त्वचेची निगा**, किं. ८ आ., ट. ख. ५ आ.
८. **गुरुबाजी** ( नाटक ) किं. ८ आ., ट. ख. ५ आणे
९. **वेश्याव्यवसाय**, किं. २ रु., ट. ख. ६ आ.
१०. **तेरा गोष्टी**, किं. २ रु. ट. ख. ५ आ.
११. **न्यायाचा शोध** ( नवीन सामाजिक नाटक )
किंमत १ रु., ट. ख. ५
१२. **पॅरिसच्या परी**, किं. ३ रु., ट. ख. ६ आणे.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## डॉ. के. भा. लेले

१. **ब्रह्मचर्याचे दुष्परिणाम**, २ री आ., किं ५ आ.
२. **मूळव्याध**. किं. ४ आ.

मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई-७
मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई-४